सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य
३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४६५/४५०/४४२/४४३/४४७
ई-मेल – desk2@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: https://dte.maharashtra.gov.in

महत्वाचे परिपत्रक/कालमर्यादित

क्रमांक : २ /एनजीसी/Intake Approval/२०२४/५०८ दिनांक : 19 JUL 2024

प्रति,
प्राचार्य/संचालक
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील साठी तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहिती पडताळणी करुन अद्ययावत करणेबाबत..

संदर्भ : १)मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र - १२२४/प्र.क्र.०३/कें.प्र.प्र./२०२४/९६८,दिनांक १०.६.२०२४

२) संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २ /एनजीसी/Intake Approval/२०२४/४४० दिनांक : ३.७.२०२४

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मधील पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता सहभागी असणा-या संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेश क्षमतेबाबतची माहिती अचूक व अद्ययावत असणे आवश्यक आहे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांचेमार्फत पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया लवकरच सुरु होणार असल्याने संस्थेबाबत पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संबंधित शिखर परिषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार संबंधित विद्यापीठ यांचेकडून संलग्नता/ समकक्षता प्रदान केल्याची माहिती तसेच त्यासोबतची संस्थेची सांख्यिकीय माहिती तंत्र शिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या https://ugpg24.dtemaharashtra.gov.in/ या लिंकवर अद्ययावत करुन **दि. १९ जुलै २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत** ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याबाबत संदर्भाधीन परिपत्रकान्वये कळविण्यात आले होते. मात्र थोडयाच संस्थांनी त्यांची माहिती अद्ययावत केल्याचे निदर्शनास आले आहे. प्रवेशासंबंधी माहिती,त्याची संवेदनशीलता आणि कालमर्यादा विचारात न घेता संस्थांनी माहिती भरण्याबाबत दर्शविलेली दिरंगाई समर्थनीय नाही.

ज्या संस्थांच्या प्रवेशक्षमता वाढ,घट,अभ्यासक्रमाच्या नावात बदल इत्यादी बाबी प्रस्तावित नाहीत अशा सर्व संस्थांनी त्यांची माहिती प्राथम्याने तात्काळ सदर लिंकवर अद्ययावत करुन विभागीय कार्यालयाकडून निश्चित करुन घ्यावी. तसेच ज्या संस्थांचे प्रवेशक्षमता वाढ,घट,अभ्यासक्रमाच्या नावात बदल इत्यादी प्रस्ताव शासन निर्णयाकरिता प्रलंबित असून शासन निर्णयाअभावी माहिती भरता आलेली नाही अशा संस्थांनी त्यांचे शासन निर्णय निर्गमित झाल्यानंतर संबंधित विद्यापीठांकडून संलग्नता प्राप्त करुन घेऊन त्याची **माहिती ३ दिवसांत सदर** लिंकवर अद्ययावत करणे आवश्यक आहे. सर्व संस्थांनी दिनांक २६.७.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत माहिती अद्ययावत करणे बंधनकारक आहे.

ज्या संस्था अशी माहिती अद्ययावत करणार नाहीत अशा संस्थांचा समावेश केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित संस्थेची राहील याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ. विनोद मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : १. मा.प्रधान सचिव ,महाराष्ट्र शासन,उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीसाठी सादर
२.मा.आयुक्त , राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित

३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर - त्यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक आपण आपल्या स्तरावरुन आपल्या अधिनस्त सर्व संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे. पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांनी सादर केलेली माहिती पडताळणी करुन व ती माहिती प्रमाणित करुन संकेतस्थळावर दि. २८ जुलै २०२४ सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अद्ययावत करावी व त्याबाबतचा अंतिम अहवाल संचालनालयास सादर करावा.

४. अध्यक्ष / सचिव, सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था, यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

५. कार्यासन अधिकारी, का. क्र. ३, मुख्य कार्यालय, मुंबई - यांना कळविण्यात येते की, विभागीय कार्यालयांकडून पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांची प्रमाणित केलेली माहिती राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना सादर करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.